## निवडक

### नागझर येथील वंस देव देवस्थानचा आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड



**पेडणे, दि. ३** : पेडणे तालुक्यातील नागझर येथील श्री वंस देव देवस्थानचा १० वा वार्षिक वर्धापनदिन मंगळवार दि. ४ रोजी विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांसह साजरा करण्यात येणार आहे.
सकाळपासून वंस मंदिरात धार्मिक विधी होईल. यात सकाळी ९ वा. लघुरुद्र, दुपारी १२ वा. आरती, तीर्थप्रसाद होईल. दुपारी १.३० वाजता महाप्रसाद होईल. दुपारी ३ वाजता इब्रामपूर येथील सातेरी महिला दिंडी ढोल पथकाच्या गजरात नागझर गावात पालखीतून मिरवणूक काढण्यात येईल. दरम्यान सुवासिनींकडून ओटी भरण्याचा कार्यक्रम होईल. रात्री १० वाजता वावळेश्वर दशावतार नाट्य मंडळातर्फे नाट्य प्रयोग होईल. बुधवार दि. ५ रोजी रात्री १० वाजता खानोलकर दशावतार नाट्य मंडळातर्फे लग्ना आदी बाप हे नाटक सादर होईल. गुरूवार दि. ६ रोजी रात्री १० वाजता अभिनव कला थिएटर सादर करणार आहेत. राजीव कला मंदिर फोंडा आयोजित ९ व्या अखिल गोवा महिला संगीत नाट्य स्पर्धेतील तृतीय पारितोषिक प्राप्त महान संगीत पौराणिक नाटक मत्स्यगंधा. भाविकांनी आणि नाट्य रसिकांनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

---

### आमोणा व पर्ये फिडरवर उद्या वीजपुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

साखळी, दि. ३ : बुधवार दि. ५ रोजी दुपारी २ ते संध्या. ५.३० यावेळेत ११ केव्ही आमोणा व ११ केव्ही पर्ये फिडरवर १० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर देखभालीचे काम करायचे असल्याने वसंतनगर,रवींद्र भवन परिसर,वरचे हरवळे,तामिडगी पर्ये,केसरकरवाडा मोर्ले,चिंचमळा पर्ये व मोर्ले ग्रामपंचातीजवळ वीज पुरवठा खंडित करण्यात येणार आहे.यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### म्हारुदेव नागझरकर देवस्थानात आजपासून विविध कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे दि. ३** : नागझरवाडा – भोमा येथील श्री म्हारुदेव नागझरकर या जागृत देवस्थानची ४७ वी वार्षिक श्री सत्यनारायण महापूजा उद्या मंगळवार दि. ४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यानिमित्त ४, ५ व ६ मार्च असे तीन दिवस समिती , ग्रामस्थ व भाविकांतर्फे विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
हजारो वर्षांपूर्वीपासून भोमा गावातील 'पंच पंचिष्ट्यातील ' हे जागृत राखणदार देवस्थान हाकेला पावणारे व संकटातून वाचविणारे श्रद्धास्थान मानले जाते. मंगळवारी सकाळी विधिपूर्वक श्री सत्यनारायण महापूजा, दुपारी १ वा. तीर्थप्रसाद व महाप्रसाद, संध्याकाळी ६ वाजता भजनाचा कार्यक्रम, रात्री कला चेतना वळवई आणि राजदीप नाईक प्रस्तुत 'गाव जालो जाणटो ' हा कोंकणी नाट्यप्रयोग होईल.
बुधवारी ५ संध्याकाळी ७ वाजता हरिपाठ, रात्री १० वाजता श्रीनिका क्रियेशन नागेशी प्रस्तुत 'श्री. व सौ. दाबोळकर ' हा नाट्यप्रयोग होईल. गुरुवारी ६ रात्री ८ वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रम होईल. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

---



**शिवोली : श्रीदेवी सातेरी च्या वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त आयोजित पालखीमध्ये सहभागी भावीक.**

### शिवोलीतील देवी सातेरी संस्थानाचा उद्या उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ३** : शेळ, शिवोली, बार्देश येथील श्री देवी सातेरी संस्थानचा प्रतिवार्षिक होणार यंदाचा ४७ वा वर्धापनदिन/दिवजोत्सव बुधवार, दि. ५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त सकाळी श्रींची पंचामृत अभिषेकासहित अलंकार महापूजा, दुपारी श्रींस महानैवेद्य, महामंगलारती व सामुदायीक प्रार्थना झाल्यानंतर महाप्रसाद वितरण होईल. तद्नंतर भाविक/सुवासिनींकडून श्रीस भेटवस्तू व ओटी भरण्याचा सोपस्कार स्वीकारला जाईल. संध्या. ७ ते ८.३० पर्यंत देवीस नेसवलेल्या वस्त्रांचा लिलाव/पावणी होईल व रात्री ९ वाजता ढोलताश्यांच्या गजरात, दारूसामानाच्या आतषबाजीत व बँडच्या तालात श्रींचा प्राकारात शिबिकोत्सव/ दीपोत्सव साजरा होईल. या उत्सवानिमित्त देवींची पालखी मिरवणूक संपूर्ण गावात काढली जाते. या पालखी मिरवणुकीत अनेक भाविकांनी मोठ्या उत्साहाने देवीचे दर्शन घेतले आहे.

---

# काणकोण एप्रिल-मे महिन्यात 'टँकरमुक्त' होणार

## सभापती रमेश तवडकर | ९३ कोटींच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम तीन टप्प्यांत सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

**काणकोण, दि. ३** : काणकोण तालुक्यातील दोन धरणांमुळे पाण्याची कमतरता जाणवत नसल्याचा दावा करत, विधानसभा अध्यक्ष आणि काणकोण मतदारसंघाचे आमदार रमेश तवडकर यांनी एप्रिल आणि मे महिन्यात संपूर्ण तालुका 'टँकरमुक्त' करण्याचे आश्वासन दिले आहे. सध्यस्थितीत ९३ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे काम तीन टप्प्यांत सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सोमवारी पोळे येथे अंदाजे ३३ लाख रुपये खर्चाच्या पाणीपुरवठा पाईपलाईन बदलण्याच्या कामाचे उद्घाटन करताना आमदार तवडकर बोलत होते. त्यांनी यावेळी काणकोण नगरपालिकेतील पाणीपुरवठा





सुधारण्यात यश आल्याचे सांगितले. तसेच, लोलये पोळे, पैंगीण, खोतीगांव आणि गावडेग्राम येथे उद्भवणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांचे समाधान आगामी महिन्यांत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

तवडकर यांनी सांगितले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३८ कोटी रुपयांची कामे मंजूर झाली असून, उर्वरित दोन टप्प्यांना काहीसा अधिक वेळ लागणार आहे. गवाणे धरणाची ५ दशलक्ष लिटर क्षमतेची पाण्याची सुविधा कार्यान्वित झाल्यानंतर या संपूर्ण परिसरात नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा शक्य होईल, असेही त्यांनी नमूद केले.

पोळे येथील ३३ लाख रुपये खर्चाच्या पाईपलाईन बदल प्रकल्पाविषयी बोलताना तवडकर म्हणाले, जुनाट पायाभूत सुविधा सुधारण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प हाती घेतला असून, त्यामुळे पाणी दूषित होण्याचा धोका कमी होईल आणि स्थानिक नागरिकांना अखंड व स्वच्छ पाणीपुरवठा मिळेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर या भागातील पाणीटंचाईची समस्या सुटण्याची अपेक्षा आहे.

काणकोण तालुक्यात दोन मोठी धरणे असल्यामुळे येथील संपूर्ण भागाला १२ तास पाणीपुरवठा करण्याची क्षमता आहे. मात्र, काही भागांना केवळ दोन महिन्यांसाठी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आम्ही कार्यरत आहोत. आगामी काही महिन्यांत तालुका पूर्णतः 'टँकरमुक्त' होईल, याची खात्री आम्ही देत आहोत, असे तवडकर यांनी स्पष्ट केले.

---

# कनेक्शन तोडलेले असूनही ५७४ रु. पाणी बील

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३** : सेरावली मधील एका कुटुंबाचे पाणी कनेक्शन गेल्या वर्षभरापूर्वी अधिकाऱ्यांनी कोणतेही स्पष्टीकरण न देता तोडले असले तरी त्यांना अजूनही पाण्याचे बिल मिळत असल्याच्या धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.त्याहूनही त्रासदायक गोष्ट म्हणजे गेल्या वर्षभरापासून माहिती अधिकार (आरटीआय) कायद्यांतर्गत दाखल केलेल्या अर्जाच्या उत्तराची कुटुंब वाट पाहत आहे.

येथील रहिवासी डिटोझा फर्नांडिस यांचे कुटुंब गैरवर्तन आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षम कार्यपद्धतीमुळे मोठ्या अडचणींना तोंड देत आहे. कुटुंबाला अलीकडेच पाण्याच्या वापरासाठी ५७४ रुपयांचे बिल मिळाले आहे, जरी त्यांना कोणताही पाणीपुरवठा झाला नसला तरी. कुटुंबाला पाणी बिल मिळण्याची ही दुसरी घटना आहे.

याबाबत कुटुंबातील सदस्य डिटोझा फर्नांडिस यांनी स्पष्ट केले की फेब्रुवारी २०२४ मध्ये अधिकाऱ्यांनी अचानक त्यांचा पाणीपुरवठा बंद केला आणि संपूर्ण पाईपलाईन काढून टाकली.

मला २०१९ मध्ये पाणी कनेक्शन मिळाले होते, परंतु पुरवठा खंडित झाल्यानंतर, मी ताबडतोब पाईपलाईन तोडण्याची आणि तोडण्याची कारणे विचारणारा अर्ज दाखल केला आणि त्यानंतर २८ फेब्रुवारी रोजी आरटीआय अर्ज दाखल केला, असे त्यांनी सांगितले .

फर्नांडिस पुढे म्हणाल्या की, कनेक्शन तोडल्यापासून एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटला तरी, अधिकाऱ्यांनी तिच्या अर्जाला अद्याप प्रतिसाद दिलेला नाही. जरी फेब्रुवारीमध्ये पाणी कनेक्शन बंद करण्यात आले असले तरी, आम्हाला डिसेंबर २०२४ मध्ये १६६ रुपयांचे बिल मिळाले. आता, दुसऱ्यांदा, आम्हाला कधीही पुरवठा न झालेल्या पाण्याचे ५७४ रुपयांचे बिल मिळाले आहे, असे फर्नांडिस यांनी स्पष्ट केले.

फर्नांडिस कुटुंब सध्या त्यांचे पाणी कनेक्शन पुनर्संचयित करण्यासाठी संघर्ष करत आहे आणि त्यांनी ही समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाची विनंती देखील केली आहे.

---

# पणजीतील बेवारस वाहनांबाबत गोवाकॅनकडून चिंता व्यक्त

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३** : गोवा सिव्हिक अँड कंझ्युमर ॲक्शन नेटवर्क (गोवाकॅन ) संस्थेने पणजीतील पे–पार्किंग क्षेत्रात बेवारस अवस्थेत उभ्या असलेल्या वाहनांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. ही वाहने डासांच्या उत्पत्तीचे कारण ठरू शकतात तसेच आगीच्या अपघातांना आणि चोरीस देखील प्रोत्साहन देऊ शकतात, असे गोवाकॅनचे म्हणणे आहे.

गोवाकॅनने पणजी महानगरपालिकेचे आयुक्त क्लेन मदेरा यांना पाठवलेल्या पत्रात 'पाटो' पार्किंग क्षेत्रातील काही बेवारस वाहनांचे फोटो सादर केले आहेत. या वाहनांमुळे महानगरपालिके द्वारे नियुक्त पे–पार्किंग कंत्राटदारांची कार्यक्षमता आणि व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

संस्थेने असा आरोप केला आहे की,महानगरपालिकेच्या पे–पार्किंग कंत्राटदाराने नियुक्त केलेल्या क्षेत्रांमध्ये अशा बेवारस वाहनांची नोंद घेण्यासाठी कोणतीही प्रभावी यंत्रणा उपलब्ध नाही. तसेच, वाहतूक पोलिस आणि परिवहन संचालनालयालाही याबाबत नियमित माहिती दिली जात नाही, हेही स्पष्ट झाले आहे.

राज्यातील वाढत्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर, सार्वजनिक ठिकाणी बेवारस अवस्थेत उभ्या असलेल्या वाहनांबाबत योग्य अधिकाऱ्यांना सूचना देऊन आवश्यक ती कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, सरकारी विभाग आणि खाजगी कंपन्यांनी पे–पार्किंग क्षेत्रात वाहने बेवारस अवस्थेत सोडल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जावी, अशीही मागणी संस्थेने केली आहे.

या पार्श्वभूमीवर, शहरातील पार्किंग आणि वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी महानगरपालिका , परिवहन संचालनालय, गोवा वाहतूक पोलिस, आरोग्य सेवा संचालनालय, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा संचालनालय, जिल्हा पोलिस आणि पे–पार्किंग कंत्राटदार यांची संयुक्त बैठक बोलावण्याची मागणी गोवकॅन ने केली आहे.

गोवाकॅनच्या या पत्राच्या प्रती उत्तर गोवा जिल्हाधिकारी, वाहतूक, नगरविकास, अग्निशमन आणि आपत्कालीन सेवा, ग्राहक व्यवहार संचालक, एनव्हीबीडीसीपीचे उपसंचालक, उत्तर पोलिस अधीक्षक (एसपी) आणि वाहतूक पोलिस अधीक्षक (वाहतूक) यांना पाठवण्यात आल्या आहेत.

---

# बेकायदेशीर मासेमारीमुळे कुंडईतील भातशेती जलमय

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ३** : कुंडई येथील शेतकरी दिनेश गावडे यांनी फोंडा मामलतदारांकडे तक्रार दाखल केली आहे की, अनधिकृत मासेमारीसाठी नदीचे पाणी त्यांच्या भातशेतीत सोडण्यात आल्याने त्यांचे शेत जलमय झाले आहे. परिणामी, त्यांना शेती करण्यास अडचण निर्माण झाली आहे.

गावडे यांच्या तक्रारीनुसार, पारंपरिक मानस (स्लुइस गेट) प्रणालीचा गैरवापर करून नदीचे पाणी शेतीत वळवले जात आहे, ज्यामुळे ते रब्बी हंगामातील लागवड करू शकत नाहीत. त्यांनी प्रशासनाला तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली असून, दोषींवर कठोर कारवाई करण्याची तसेच शेतीसाठी आवश्यक गोड्या पाण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली आहे.

गावडे यांनी वारंवार प्रशासनाकडे पाठपुरावा केला असला, तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. शेत खाऱ्या पाण्याने



भरल्याने मी रब्बी हंगामातील लागवड करू शकत नाही. शेती सुरू करण्यासाठी पाणी बाहेर काढण्याची आवश्यकता आहे, मात्र अद्याप कोणतेही पाऊल उचलले गेलेले नाही, असे त्यांनी सांगितले. यासोबतच, त्यांनी शेतकऱ्यांना शेतीसाठी मदत करण्याऐवजी काही जण आपल्या स्वार्थासाठी अनधिकृत मासेमारीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक शेतीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. मात्र, काही व्यक्ती शेतीच्या नुकसानाच्या बदल्यात स्वतःचा फायदा पाहत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, फोंडा मामलतदारांनी या तक्रारीची गंभीर दखल घेत संबंधित व्यक्तींना नोटिसा बजावल्या असून, शेतीसाठी बाधा ठरणारे अनधिकृत जलव्यवस्थापन रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

---

# बनावट विवाह नोंदणी प्रकरणांची चौकशी करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ३** : मडगाव सब–रजिस्ट्रार कार्यालयात बनावट कागदपत्रांच्या आधारे विवाह नोंदणी होत असल्याच्या आरोपांमुळे वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी दक्षिण गोवा ॲडव्होकेट्स असोसिएशनने मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याकडे केली आहे. संघटनेच्या व्यवस्थापकीय समितीने अध्यक्ष ॲड. प्रसाद नाईक यांच्या नेतृत्वाखाली आणि ॲड. नरेंद्र सावईकर यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यांनी या गैरव्यवहारांविरोधात तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

ॲडव्होकेट्स असोसिएशनने मुख्यमंत्र्यांना सादर केलेल्या याचिकेत नमूद केले आहे की, विवाह नोंदणीसाठी मोठ्या प्रमाणावर बनावट निवास प्रमाणपत्रे वापरली जात आहेत. एजंट आणि दलालांकडून ही बनावट कागदपत्रे तयार केली जात असून, काही जण स्वतःला वकील असल्याचे खोटे भासवत आहेत. यामुळे कायदेशीर समुदायाच्या प्रतिष्ठेला तडा जात आहे, असा आरोप करण्यात आला आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, निवास प्रमाणपत्रे, विवाह नोंदणी, नाव बदल, विक्री करार आणि अन्य अधिकृत कागदपत्रांसाठीही अशी बनावट कागदपत्रे सरकारी विभागांना सादर केली जात आहेत. जर यावर त्वरित कारवाई झाली नाही, तर संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेला धोका निर्माण होईल, असा इशारा वकिलांनी दिला आहे.

या प्रकारांना आळा घालण्यासाठी, विवाह नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने संघटनेने काही महत्त्वपूर्ण सूचना दिल्या आहेत. कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करण्यासाठी एक सक्षम यंत्रणा विकसित करावी, अर्जांवर प्रक्रिया करताना बनावट कागदपत्रे शोधण्यासाठी प्रगत पडताळणी प्रणाली असावी आणि अंतिम विवाह नोंदणी प्रमाणपत्रावर अर्जदार व घोषणाकर्त्यांचे फोटो जोडण्याची सक्ती करावी अशा या सूचना आहेत.

वकिलांच्या शिष्टमंडळाने सादर केलेल्या मागण्यांची मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी गंभीर दखल घेतली असून, राज्य निबंधकांना तातडीने चौकशी सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. सरकार हे प्रकरण गांभीर्याने हाताळेल आणि आवश्यक त्या सुधारणा त्वरित अमलात आणल्या जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

---

# बांध दुरुस्तीसाठी सरकारकडून विलंब

**▶ कामूर्ली पंचायत क्षेत्रातील सावाणो परिसर : त्वरित कारवाई करण्याची मागणी**

■ टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ३** : कामूर्ली पंचायत क्षेत्रातील सावाणो परिसराचा बांध दुरुस्तीकडे सरकारकडून विलंब होत आहे. याबाबतचा प्रस्ताव सरकार दरबारी रेंगाळत पडलेला आहे. यावर त्वरित कार्यवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

साधारण अडीच वर्षांपूर्वी वरील परिसराची संयुक्त पाहणी स्थानिक आमदार तसेच मंत्री नीळकंठ हलरणकर व जलस्त्रोत खात्याचे मंत्री सुभाष शिरोडकर यांनी केली होती. त्यानंतर पाच सहा महिन्यात तरी कामाला प्रत्यक्षात सुरुवात होईल अशी अपेक्षा केली जात होती. पण अडीच वर्षे झाली तरीही काहीच हालचाल होत नसल्याने



ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. प्राप्त माहितीनुसार, अंदाजे एक कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव सरकारच्या अर्थ खात्यात मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.

कामुर्ली पंचायत क्षेत्रातील वागाळी व दरबार वाड्याला जोडणाऱ्या सावाणो परीसराच्या बांधाची अवस्था धोकादायक झाली आहे. या ठिकाणी बांध पुर्णपणे कुमकुवत झाला आहे. शापोरा नदिकिनारी हा बांध असून या बांधावरच मुख्य रस्ता आहे. या रस्त्यावरुनच शिवोली ओशेल खैराटमार्गे कामुर्ली ते म्हापसा येथे जाता येते. या कुमकुवत बांधामुळे हा मार्ग बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या अनेक वर्षापासुन ही समस्या येथे भेडसावत आहे. यापुर्वीही येथे बांध कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. पण सार्वजनीक बांधकाम खात्यातर्फे प्रत्येकवेळेस तात्पुरती मलमपट्टी केली जाते. काही वर्षापुर्वी येथील बांधावर लाकडी ओंडके लावुन तात्पुरती दुरुस्ती केली होती. बांध कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या बांधाची पाहणी केल्यानंतर हा बांध धोकादायक असल्याचे आमदार हळर्णकर यानी मान्य केले होते . यावेळी काही पंचसदस्यही उपस्थित होते. सावाणो बांध हा परीसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी योग्य असल्याने येथे रिवर फ्रंट बांधून बोट व्यवसाय सुरू करण्यासाठी उपयुक्त आहे.तसे झाल्यास या ठिकाणी बेरोजगाराना व्यवसाय मिळणे शक्य असल्याचे मत व्यक्त केले जाते. एका बाजुने डोंगर व दुसऱ्या बाजुने नदी व मध्ये रस्ता अशी या ठिकाणीची रचना आहे. यामुळे डोंगराच्या बाजूने रस्ता साधारण पाच सहा मिटर रुंद केल्यास समस्या निवारण होण्याची शक्यता आहे.

> **सावाणो धोकादायकच !**
>
> **सावाणो परीसर हा धोकादायक असल्याचा अनुभव येथील नागरीकानी यापुर्वीही घेतला आहे. या ठिकाणी वाहनांची नेहमीच वर्दळ असते. अनेक स्थानिकही येथे हवापालटासाठी येतात. काहीजण येथे नदीत गळ टाकून मासे पकडण्याचे काम करीत असतात. हे लोक काठावर उभे राहत असल्याने बांध कधी कोसळेल याची शाश्वती नाही. गेल्या अनेक वर्षापासुन तर या बांधाला अनेक ठिकाणी कठडेच नाही. यामुळे एखादा वाहनचालकाचा वाहनावरील ताबा गेल्यास वाहन थेट पाण्यात जाते. काही वर्षापुर्वी याच ठिकाणी एक ट्रक कठड्यावरुन नदीत पडला होता. या दुर्घटनेत किनळेकर नामक युवा ड्रायव्हरचा मृत्यू झाला होता. तेव्हापासून लोकांनी मागणी करुनही येथे उपाययोजना करण्याचे काम झालेले नाही. याबाबत पंचायतीने वारंवार पाठपुरावा केल्याचा दावा विद्यमान पंचायत मंडळ व पुर्वीचे पंचायत मंडळ करीत आहे.**

---

# सरस २०२५ महोत्सवात पर्यटकांना कापड निर्मितीचा अनुभव

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३** : गोवा कला अकादमीच्या दर्यासंगम येथे ६ ते १६ मार्च दरम्यान आयोजित होणाऱ्या सरस २०२५ महोत्सवात पर्यटक आणि कापडप्रेमींना स्वतःचे टॉवेल, स्कार्फ किंवा रुमाल आठवण म्हणून तयार करण्याची अनोखी संधी मिळणार आहे.

या दहा दिवसीय महोत्सवात ग्रामीण विकास संस्था पारंपरिक कुणबी हातमाग मशीन प्रदर्शित करणार आहे, जे पर्यटकांना गोव्याच्या पारंपरिक विणकाम प्रक्रियेचा थेट अनुभव घेण्यास मदत करेल.

ग्रामीण विकास मंत्री गोविंद गावडे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, हलके आणि श्वास घेण्यास सुलभ असलेले कुणबी कापड गोव्याच्या दमट हवामानासाठी आदर्श आहे, त्यामुळे स्थानिक आणि पर्यटकांमध्ये त्याची मोठी मागणी आहे. गोव्याच्या संस्कृतीला चालना देण्यावर यंदाच्या सारस महोत्सवात विशेष भर देण्यात आला आहे. यावर्षीचा महोत्सव मागील आवृत्त्यांपेक्षा अधिक भव्य आणि आकर्षक होणार आहे, असे गावडे यांनी स्पष्ट केले.

या महोत्सवात ५५० हून अधिक स्टॉल्स असतील, ज्यामध्ये १२० स्टॉल उत्तर भारतीय कलाकार आणि विक्रेत्यांसाठी राखीव असतील, तर २०५ स्टॉल गोव्यातील स्वयं–सहायता गटांना समर्पित असतील.

गावडे म्हणाले, हा महोत्सव स्थानिक कारागीर, हस्तकलाकार आणि कलाकारांना त्यांच्या कलाकृतींसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देतो. गोव्याच्या पर्यटन उद्योगामुळे या उत्पादनांना देशभर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी मागणी निर्माण होते.

८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त, मुख्यमंत्री प्रमोद सावंत गोव्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी १० इलेक्ट्रिक बाईक वाटप करणार आहेत. हा उपक्रम महिलांना अधिक आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरेल. सरस २०२५ महोत्सव केवळ खरेदीसाठी नव्हे, तर गोव्याच्या पारंपरिक संस्कृतीला अनुभवण्याची आणि स्थानिक कलाकृतींना प्रोत्साहन देण्याची एक अनोखी संधी ठरणार आहे.